लोकमत

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**II Extention for E-Tender No.705, 708,To 710.**

It is hereby notified to the concerned that the last date for submitting online tender has been extended for **1)** Supply, Installation & commissioning of Fluorescence Microscope, **(705) 2)** Supply & Installation of Wooden Furniture, **(708) 3)** Desktops Computer & Workstation, **(709) 4)** Laptops, **(710) till 26/08/2021 up to 5.00 p.m.** The details are available on web-site **"http://unishivaji.sets.co.in"** Those who have submitted tender earlier need not submit it again. University reserve Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. .

SU/Stores/ **Dr. Vilas.D.Nandavadekar**

Date- 19/08/2021 Registrar

19 AUG 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भीमा कृष्णा स्थिरीकरण योजना फसवी

## पर्यावरण अभ्यासक प्रदीप पुरंदरे यांचा सवाल : अलमट्टीबाबत तातडीने निष्कर्ष नकोच

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर:** महापुराचे अतिरिक्त पाणी वाहून नेण्याचे कारण देत पुढे रेटलेली भीमा कृष्णा स्थिरीकरण योजना ही शंभर टक्के फसवी आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोघांचही यात नुकसान आहे. याच्या मंजुरीला लवादाने विरोध केला असतानाही ती योजना रेटण्याचा अट्टहास का असा सवाल पर्यावरण अभ्यास प्रदीप पुरंदरे यांनी बुधवारी कोल्हापुरात केला.

कोल्हापूर सांगलीत पाठोपाठ येऊन गेलेल्या महापुराच्या संदर्भात राज्यातील पर्यावरण अभ्यासकांनी एकत्र येऊन अभ्यास सुरु केला आहे. यातील एक सदस्य असलेले पुरंदरे हे पहिल्या टप्प्यात राज्यभर दौरे करत आहेत. बुधवारी त्यांनी कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागात सर्व घटकांशी संवाद साधला.

पुरंदरे म्हणाले, स्थिरीकरण योजना वरवर चांगली वाटत असलीतरी ती भविष्यातील पाणीवादाची कारण ठरणारी आहे. मुळातच एका खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यात पाणी वळवणे हे प्रचंड खर्चिक व जैवविविधतेची हानी करणारे आहे, हे माहीत असूनही आतापर्यंत यावर ६०० कोटी रुपये खर्च झाले आहेत. आता परत नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट ॲथोरेटिने १२ हजार कोटी रुपये गुंतवून हा प्रकल्प पुढे नेण्याचे ठरवले आहे. मुळात जो प्रकल्प व्यवहार्यच नाही त्यावर एवढा खर्च कशासाठी. हा एक प्रकारे कोरडा जलविकास असून यातून कांहीही साध्य होणार नाही. मुळात पाणी केव्हा जादा आहे, हे कसे ठरवणार आणि महापुराचे चार दिवसाचे पाणी देऊन बाकीचे दिवस काय करणार याची जोवर उत्तरे मिळत नाहीत, तोवर हातचे सोडून पळत्याचे मागे धावण्यासारखे आहे.

बैठकीचे सूत्रसंचालन गिरीश फोंडे यांनी केले. भूगोल विभागाचे प्रा. सचिन पन्हाळकर यांनी पंचगंगा खोऱ्यातील महापुराची निरीक्षणे मांडली. पर्यावरण अभ्यास उदय गायकवाड, आपचे संदीप देसाई, जनता दलाचे शिवाजीराव परुळेकर, मधुकर बाचूळकर, एन.एस.पाटील, प्रकाश कांबळे, प्रसाद जाधव, चंद्रकांत कांडेकरी, आदींनी चर्चेत सहभाग घेत सूचना मांडल्या.



कोल्हापूर, सांगलीतील महापुराच्या कारणांचा शोध घेण्यासाठी पर्यावरण अभ्यासक प्रदीप पुरंदरे यांनी बुधवारी शिवाजी विद्यापीठात बैठक घेऊन मते जाणून घेतली. (छाया: नसीर अत्तार)

### ...तर कर्नाटकशी चर्चा कशाला करता?

- अलमट्टी धरणामुळे पूर येतो की नाही याचा अजून फारसा अभ्यास झालेला नाही. वडनेरे समितीने २०१२ च्या आकड्यानुसारच निष्कर्ष काढला असलातरी अजूनही अभ्यासाची गरज व्यक्त केली आहे. त्यामुळे त्यांच्यामुळे पूर आलाच नाही असा घाईघाईने निष्कर्ष काढण्याची अजिबात गरज नाही. अलमट्टी कारणीभूत नाही तर मग जलसंपदा विभाग कर्नाटकशी चर्चा का करते असा सवालही पुरंदरे यांनी केला.

### पूरनियमन नीती गरजेची

कमी वेळात जास्त पाऊस हे आता कायम घडणार हे गृहीत धरून राज्य सरकारने संपूर्ण राज्यासाठी स्वतंत्र पूरनियमन नीतीची गरज आहे. यासाठी कायदा करून त्याची नियमावली व अंमलबजावणीसह महापुराच्या नुकसानीची जबाबदारीही निश्चित करणे ही काळाची गरज आहे.

### नदीकाठचा ऊसही कारणीभूत

महापुराला नदीकाठचा ऊस कारणीभूत ठरल्याचे निरीक्षण नोंदवताना पुरंदरे यांनी ऊस लागणीची पध्दत बदलायला हवी, पात्रापासून किती अंतरावर शेती करावी याबाबतचे नियम असावेत, असेही सुचवले

### नदीजोड अव्यवहार्य

नदीजोड प्रकल्पाविषयी बोलतानाही पुरंदरे यांनी हा प्रकल्प पूर्णपणे अव्यवहारी व पर्यावरणाचे विनाश करणारा असल्याचे निरीक्षण नोंदवले. नदीपात्रातील गाळाचा सर्व्हे करण्याची आवश्यकता व्यक्त करून नदीपात्रातील बांधकामाच्या बाबतीत वेगळ्या नियमावलीचा विचार करावा लागणार असल्याचेही निरीक्षण मांडले.

लोकमत

# सतीश पाटील यांना पीएच.डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



रसायनशास्त्र विभागाचे संशोधक विद्यार्थी सतीश शिवाजी पाटील यांना विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. 'टेम्प्लेट फ्री सिंथेसिस ऑफ मल्टीनॅरी नॅनो क्रिस्टलाइन मेटल चाल्कोजेनाईड थीन फिल्म्स व्हाया हैड्रोथेर्मल रूट फॉर एफिशियंट सोलर सेल अॅप्लिकेशन' हा त्यांच्या पीएच.डी.चा विषय होता. त्यांना संशोधनासाठी डॉ. पी. एन. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. पाटील यांचे प्राथमिक शिक्षण हे विद्यामंदिर कासारी, तर माध्यमिक व पदवीपर्यंतचे शिक्षण देवचंद कॉलेजमध्ये झाले.

लोकमत

# 'भुईभिंगरी'चे शनिवारी प्रकाशन

कोल्हापूर : येथील प्रा. वसंत खोत लिखित 'भुईभिंगरी'या आत्मकथनाचे प्रकाशन शनिवारी (दि. २१) सायंकाळी पाच वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ऑनलाइन पध्दतीने होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

लोकमत

# 'स्वयंम' परीक्षेच्या विद्यार्थ्यांना आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत सहाय्यक पदासाठी दि. २० ऑगस्ट रोजी, तर विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत दि. २८ आणि २९ ऑगस्ट रोजी स्वयंम परीक्षा होणार आहे. या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची उन्हाळी सत्रातील पुनर्परीक्षा आयोजित केली जाणार आहे. त्याबाबतचे वेळापत्रक परीक्षा विभागाकडून जाहीर केले जाईल. या विद्यार्थ्यांची माहिती त्यांच्या महाविद्यालयाने परीक्षा विभागाला कळवावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 AUG 2021
लोकसत्ता

# महापुरांची समस्या 'नदीजोड'ने न सुटणारी - प्रदीप पुरंदरे

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** सततच्या महापुरांची समस्या नदीजोड प्रकल्प योजनेतून सुटणारी नसून या समस्येचा खोलवर अभ्यास करत त्यासाठीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणे त्यासाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट मत जलतज्ज्ञ प्रदीप पुरंदरे यांनी बुधवारी येथे व्यक्त केले.

कोल्हापूर-सांगलीतील सतच्या महापुरामागची कारणे व त्यावरील उपायांचा शोध घेण्यासाठी बुधवारी राज्यातील पर्यावरण क्षेत्रात कार्यरत तज्ज्ञ, अभ्यासकांच्या उपस्थितीत शिवाजी विद्यापीठात एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुरंदरे यांनी वरील मत व्यक्त केले.

या दोन जिल्ह्यांत सतत येणाऱ्या महापुरामागची कारणे अगोदर तपासली पाहिजेत असे सांगत पुरंदरे म्हणाले, की यासाठी कृष्णा खोरे व अलमट्टी धरण याचा समग्र अभ्यास होणे गरजेचे आहे. अलमट्टी धरणाला 'क्लिन चिट' देण्याचा वडनेरे समितीचा निर्णय धोरणात्मक चूक ठरू शकते.

महापूर नियंत्रण करण्यासाठी नद्याजोड प्रकल्प राबवावा का, या मुद्द्यावर पुरंदरे म्हणाले, की महापुराचे पाणी जबरदस्त वेगाने वाहत असते. त्यातील काही भाग अन्यत्र वळवून फारसा फायदा होणार नाही. नदीजोड प्रकल्प म्हणजे आणखी घातक ठरेल. पुराचे पाणी दुष्काळी भागाकडे वळवा म्हणणे हे अशक्यप्राय आहे. महापूर असो की कोणतीही आपत्ती शासन-प्रशासकीय यंत्रणा या प्रश्नांवर गांभीर्याने काम करत नाही. पूर परिस्थिती टाळायची झाल्यास आपत्ती नियंत्रण कायदा होणे गरजेचे आहे.

पूरक्षेत्रातील ऊस, नदीच्या नैसर्गिक पाणी साठवण क्षमता कमी, नैसर्गिक प्रवाहात निर्माण झालेले अडथळे याची बैठकीत चर्चा झाली.

वनस्पतीतज्ज्ञ मधुकर बाचूळकर, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड, प्रा. सचिन पन्हाळकर, प्रा. आसावरी जाधव, गिरीश फोंडे, प्रसाद जाधव, वैभवराज राजेभोसले, संदीप देसाई, प्रकाश कांबळे, सुनील भाटवडेकर, एम. एस. पाटील, महेश जाधव, चंद्रकांत कांडकर, शिवाजीराव परुळेकर, आदम मुजावर यांनीही या वेळी आपली भूमिका मांडली.

पुढारी

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## II Extention for E-Tender No.705, 708,To 710.

It is hereby notified to the concerned that the last date for submitting online tender has been extended for **1)** Supply, Installation & commissioning of Fluorescence Microscope, **(705) 2)** Supply & Installation of Wooden Furniture, **(708) 3)** Desktops Computer & Workstation, **(709) 4)** Laptops, **(710) till 26/08/2021 up to 5.00 p.m.** The details are available on web-site **"http://unishivaji.sets.co.in"** Those who have submitted tender earlier need not submit it again. University reserve Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. .

SU/Stores/ **Dr. Vilas.D.Nandavadekar**

Date- 19/08/2021 Registrar

19 AUG 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पूर नियमन कायदा होणे आवश्यक

## वडनेरे समितीचे माजी सदस्य पुरंदरे : स्वतंत्र पूर नीती तयार करावी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

पूरस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली असल्याने स्वतंत्र पूर नीती असली पाहिजे. त्यासाठी पूर नियमन कायदा करणे आवश्यक आहे. पुराची कारणे अनेक आहेत. त्यामुळे आताच त्याबाबत नेमका निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही, असे वडनेरे समितीचे माजी सदस्य प्रमोद पुरंदरे यांनी सांगितले. महापुरासंदर्भात शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागात बुधवारी आयोजित केलेल्या चर्चासत्रात ते बोलत होते. चर्चासत्रात अलमट्टीमुळे पाण्याचा निचरा लवकर होत नसल्याचे मतही व्यक्त करण्यात आले.



**कोल्हापूर : महापुरासंदर्भात शिवाजी विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात बोलताना वडनेरे समितीचे माजी सदस्य प्रमोद पुरंदरे. यावेळी प्रदीप पुरंदरे, अतुल दिघे, उदय गायकवाड, डॉ. सचिन पन्हाळकर, गिरीश फोंडे आदी उपस्थित होते. (छाया : पप्पू अत्तार)**

पुरंदरे म्हणाले, शासनाने आतापर्यंत पुरासंदर्भात १५ समित्या नेमल्या. त्यापैकी १० समित्या मुंबईतील पुराबाबत, तर उर्वरित पाच महाराष्ट्रातील अन्य जिल्ह्यांसाठी होत्या. या सर्व समित्यांनी आपले अहवाल सादर केले. परंतु; अहवालात सुचविण्यात आलेल्या एकाही शिफारशीची अंमलबजावणी सरकारने केली नाही. नद्या जोड प्रकल्प, कृष्णा खोरे स्थिरीकरण या फसव्या योजना आहेत. स्थिरीकरणाला तर लवादानेच परवानगी नाकारली आहे. नदीजोड प्रकल्पाची अवस्था 'आ बैल मुझे मार' अशी आहे. पूर संपल्यानंतर त्यांनी पाण्याची मागणी केली तर आपण देणार का? सप्टेंबर महिना संपला की पुराचे विस्मरण होते. प्रकल्पांची रक्कम सहाशे कोटी, हजार कोटी अशी असते. ही रक्कम वायाच जाणार आहे.

नदीकाठची अतिक्रमणे किंवा प्रकल्प बांधण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची आहे. परंतु; पूर आल्यानंतर त्यासाठी कोणालाच जबाबदार धरले जात नाही, असे सांगून पुरंदरे म्हणाले, जलसंपदा विभागात केवळ सिव्हिल इंजिनिअर आहेत. त्यामुळे पुराचा सखोल अभ्यास करण्यासाठी सर्व विद्या शाखांतील तज्ज्ञांना एकत्र करून त्यातून मार्ग काढला पाहिजे. ग्लोबल आणि लोकल यांचे एकत्रीकरण केले पाहिजे. नदीखोरे अभिकरण असले पाहिजे. पण त्याची अंमलबाजवणी केली पाहिजे. नदी खोऱ्यांचे व्यवस्थापन केले पाहिजे.

यावेळी शिवाजी परुळेकर यांनी, अलमट्टीमुळे आपल्याकडे पूरस्थिती निर्माण होत असेल तर त्याच्या विरोधात लढा दिला पाहिजे, असे सांगितले. डॉ. मधुकर बाचुळकर यांनी, नदी-नाल्यांच्या पात्रामध्ये अडथळे निर्माण झाल्याने त्यांच्या पात्रात बदल झाला असल्याचे सांगितले. उदय गायकवाड यांनी, अलमट्टीमुळे पाण्याचा निचरा होण्यास विलंब होत असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. सचिन पन्हाळकर, प्रसाद जाधव, संदीप देसाई, चंद्रकांत कोंडेकरी, प्रकाश कांबळे, डॉ. आसावरी जाधव, सुनील भाटवडेकर, आदम मुजावर, एन. एस. पाटील, महेश जाधव, वैभव राजेभोसले आदींनी मते मांडली. स्वागत व प्रास्ताविक गिरीश फोंडे यांनी केले.

### बांधकाम करताना ही काळजी घ्या...

प्रत्येक पुरावेळी पूररेषा ठरविली जाते. परंतु; पूर पुन्हा येणार नाही याची खात्री कोण देणार? शिवाय तेथील लोकांचे पुनर्वसन कसे करणार, हा देखील प्रश्न आहे. त्यामुळे आहे त्या ठिकाणी खालचा मजला मोकळा ठेवणे, पुराच्या पाण्याला अडथळा होणार नाही, याची बांधकाम करताना काळजी घेणे आवश्यक आहे, असे पुरंदरे यांनी सांगितले.

पुढारी

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Estd. 1962
NAAC "A++" Grade

## ADMISSION YEAR 2021-22

**OPPORTUNITY TO LEARN AT NAAC 'A++' UNIVERSITY**

## A) DEPARTMENT OF TECHNOLOGY

**(AICTE Approved and Recognized by DTE, Govt. of Maharashtra)**
Supported by TEQIP (Technical Education Quality Improvement Program), Grant of World Bank through MHRD, New Delhi

**Institute Code: EN 6028**

- B.Tech. Programee Intake : 60 • M. Tech. Programee :18

| B. Tech. Programs | Mechanical Engineering | Civil Engineering | Electronics & Telecommunication Engineering | Computer Science & Technology | Chemical Engineering | Food Technology |
|---|---|---|---|---|---|---|
| Choice Code | 602861210 | 602819110 | 602837210 | 602825410 | 602850710 | 602850310 |

| M. Tech. Programs | Energy Technology | Computer Science & Technology | Food Technology Technology | Environmental Science & Technology | Electronics Technology |
|---|---|---|---|---|---|
| Choice Code | 602837910 | 602825410 | 602850310 | 602821410 | 602837810 |

Contact : Office Phone No.- 0231- 2609424, 260 9414, 2605971
**Website: www.unishivaji.ac.in ; http://apps.unishivaji.ac.in**
**For more information contact**
B. Tech.: 9822454255, 9423041945, 9922924871, 9764997555, 9860313395, 9975490278
M. Tech.: 9850695437, 9890387898, 9860313395, 9049274380, 7588272008

## B) YASHWANTRAO CHAVAN SCHOOL OF RURAL DEVELOPMENT

(Institute approved by AICTE, New Delhi and Approved by DTE, Mumbai)
*Mission: Empowering the Youth for Rural Development*
Contact Phone (0231)2609437

- **Master of Computer Application** (DTE Code 6029)
  Under the Faculty of Science and Technology
- **Master of Rural Studies**
  Eligibility: Any Graduation with 50% Marks (45% for Reserved Category)
  Duration: Two years / Four Semesters & **Last Date of online application 25th-08-2021**
- **Master of Social Work**
  Eligibility: Any Graduation with 45% Marks
  Duration: Two years / four semesters & **Last Date of online application 25th-08-2021**
- **Master of Rural Technology**
  Eligibility: B.E./ B.Tech (All Branch), M.Sc / M.C.A (All Branch)
  Duration: Two years / Four Semesters & **Last Date of online application 25th-08-2021**
- **Master of Business Administration**
  Eligibility: Any Graduation with 50% Marks
  (45% for Reserved Category)
  Duration: Two years / Four Semesters & **Last Date of online application 25th-08-2021**

## C) दूरशिक्षण केंद्र : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी प्रवेश सूचना (Distance Education)

M.A. (Marathi, Hindi, English, Economics, History, Political Science, Sociology), M. Com., M. Sc. (Maths), MBA, BA., B.Com. etc. approved by UGC, New Delhi.

- एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र), एम. कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए., बी.ए., बी.कॉम., आदी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना प्रवेश.
- एम.बी.ए. (ए.आय.सी.टी.ई. मान्यताप्राप्त)
- पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन
- विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार, बंदीजन यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मिळणार प्रवेश.
- कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील दुर्गम भागासह ८१ अभ्यासकेंद्र
- अभ्यासकेंद्रांमध्ये संपर्क सत्रांचे आयोजन.
- ३ विषयतज्ञ प्राध्यापकांचे गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन.
- दर्जेदार स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध.
- विद्यार्थ्यांना नेट-सेट, स्पर्धा परीक्षा तसेच मुलाखत तंत्राबाबत उद्बोधन.
- विद्यार्थ्यांना Online माध्यमातून १५०० पेक्षा जास्त Video Lectures द्वारे मार्गदर्शन.
- Video conferencing द्वारे संवाद वर्ग व online learning methodology चा उपयोग
- Digital-online course material.

प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी **Pre-Registration Admission Form**
***https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLScYfckYSZWBrjFKS3StZKI6ETEerHhnsasSvn3efBo3wr76rA/viewform?usp=sf_link***

|* **File contains invalid data | In-line.JPG** *| या लिंकचा किंवा वरील QR Code चा वापर करून आपली माहिती भरावी. सविस्तर जाहिरात व इतर अनुषंगिक माहिती लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.

**अधिक माहितीसाठी :** www.unishivaji.ac.in या संकेतस्थळाच्या Distance Education या लिंकवर भेट द्या अथवा ०२३१-२६०९४५१, २६०९४५२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

**For other University Courses please visit - www.unishivaji.ac.in**

दिनांक : [illegible]

**प्रा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 AUG 2021 तरुण भारत

# नदीपात्रातील अतिक्रमणाचा शास्त्रीय सर्व्हे आवश्यक

## जलतज्ज्ञ प्रदीप पुरंदरे यांचे प्रतिपादन: शहरी पूरप्रवण क्षेत्र वाढल्याने पुनर्विचार गरजेचा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शहरी भागात ६० टक्के असलेले पूरप्रवण क्षेत्र दोन महापुरांनी वाढले आहे. ते ६५ टक्क्यांवर गेले आहे. याकडे गांभिर्याने पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी नदीपात्रातील अतिक्रमणाचा शास्त्रीय पद्धतीने सर्व्हे आवश्यक आहे. पूर ओसरण्यास ऊस पीक कारणीभुत ठरत असेल तर ऊस लावणीची पद्धत बदला, असे स्पष्ट प्रतिपादन जलतज्ज्ञ प्रदीप पुरंदरे यांनी केले.

'महापूर कारणे आणि उपाय' यासंबंधी राज्यातील जलतज्ज्ञ प्रदीप पुरंदरे यांच्या नेतृत्वाखालील पर्यावरणतज्ज्ञांचे पथक बुधवारी कोल्हापुरात आले. जलतज्ज्ञ पुरंदरे यांच्या पथकाने पूरप्रवण भागाची पाहणी केली. दुपारी शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागात कोल्हापुरातील कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधकांसमवेत त्यांनी संवाद बैठक घेतली. बैठकीत जिल्ह्यातील अभ्यासकांची मते त्यांनी जाणून घेतली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागात पर्यावरण अभ्यासकांच्या बैठकीत बोलताना जलतज्ज्ञ प्रदीप पुरंदरे. (छाया : रियाज ट्रेनर)**

जलतज्ज्ञ पुरंदरे म्हणाले, २००५ नंतर महापुरासंदर्भात अभ्यास खूप झाला, पण दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी झाली नाही. याकडे गांभियनि पहाणे आवश्यक असल्याचे सांगितले.

ते म्हणाले, पूर ओसरण्यास ऊस पीक कारणीभूत ठरत आहे. उसामुळे जमिनीत पाणी मुरणे त्याचा निचरा होण्यास उशीर होत आहे. त्यामुळे दोन सरींतील अंतर वाढवा, ऊस लावणीची पद्धत बदला, अशी सुचना त्यांनी केली.

बैठकीत भूगोल विभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी कोल्हापुरातील पूरस्थितीचे सादरीकरण केले. गिरीश फोंडे यांनी स्वागत केले. बैठकीत पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड, डॉ. मधुकर बाचुळकर, शिवाजी पळूळेकर, प्रसाद जाधव, 'आप'चे संदीप देसाई, सिव्हील इंजिनिअर चंद्रकांत कांडेकरी, सुभाष आठल्ये, प्रकाश कांदे, सुनील भाटवडेकर, आदम मुजावर, आर्किटेक्ट संघटनेचे महेश जाधव, एन. एस. पाटील, आदींनी मते मांडली. यामध्ये पुरपट्ट्यातील ऊस पीक, अतिक्रमणे, भराव, मुळ नदीपात्राची कमी झालेली रूंदी आदी प्रश्न मांडले.

या सर्व प्रश्नांना अनुसरून जलतज्ज्ञ पुरंदरे यांनी कोल्हापुरातील पुरासंदर्भात व्यापक अशी मांडणी केली. काही ठिकाणी पाणी मोजलेच गेले नाही. आपल्याकडे यासंदर्भात असलेले सॉफ्टवेअर अपडेट होणे आवश्यक आहे. बदलत्या हवामानाचा विचार करता 'थिंक ग्लोबल अँड ॲक्ट लोकल' असा संदेश त्यांनी प्रशासनाला दिला.

19 AUG 2021 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोककलावंतांनी विद्यापीठाकडे माहिती द्यावी

कोल्हापूर : कोरोना काळात ज्यांचे रोजगार गेले आहेत, त्यांना काम देऊन आर्थिक मदत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लोककलावंतांसाठी 'कोविड जनजागृती कार्यक्रम' जाहीर केला आहे. या योजनेचा लाभ देण्यासाठी शासन स्तरावर लोककलावंतांची निवड केली जात आहे. या योजनेचा लाभ कलावंताना मिळावा यासाठी योग्य माहिती संकलित होणे आवश्यक आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ परिसरातील लोककलावंतांची माहिती पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन विद्यापीठातील राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

तरुण भारत

# कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचा कार्यक्रम उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, भारती युवा शक्ती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने युवा उद्योजकता विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात भारती युवा ट्रस्टचे पोपटराव मोहिते, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एम. एम. देशमुख, विश्वनाथ पवार यांनी मार्गदर्शन केले. एखादा उद्योक उभारताना आर्थिक नियोजन, उद्योग यशस्वी करण्यासाठी खेळते भांडवल असण्याची गरज आहे. असा सुर मान्यवरांचा होता. कार्यक्रमाला युवा उद्योजकांनी हजेरी लावली होती.